Tarunbharat Pg.13 dated 28-3-18

# ‘आशाये-२०१८’ चे शानदार उद्घाटन

## • प्रा. राम मेघे तंत्रज्ञान व संशोधन संस्थेचा उपक्रम

**अमरावती, २७ मार्च** ▸▸

विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी, अमरावती द्वारा संचालित, स्थानिक बडनेरा येथील प्रा. राम मेघे तंत्रज्ञान व संशोधन संस्थेच्या वार्षिक सांस्कृतिक स्नेहसंमेलन महोत्सवाचे २७ मार्च रोजी शानदार व दिमाखदार उद्घाटन करण्यात आले.

दोन दिवसीय या महोत्सवांतर्गत विविध मनोरंजक व सांस्कृतिक स्पर्धा महाविद्यालयाच्या विद्यार्थी परिषदेद्वारे आयोजित करण्यात येतात. यावर्षी एकल व समूह नृत्य, एकल व समूह गायन, रॉक बॅण्ड शो, युथ आयकॉन, ड्रामा, टॅलेंट हॅट इत्यादी स्पर्धा घेण्यात येणार आहेत.

या महोत्सवाचा उद्घाटन सोहळा २७ मार्च रोजी प्रमुख अतिथी विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे, मलकापूरचे आमदार चैनसुख संचेती, सोसायटीचे उपाध्यक्ष प्रा. विनय गोहाड, कोषाध्यक्ष पंकज देशमुख, सचिव युवराजसिंग चौधरी, कार्यकारी सदस्य डॉ. हेमंत देशमुख, नितीन हिवसे, ॲड. उदय देशमुख, प्रा. गजानन काळे, प्रा. रागिणी देशमुख आदींच्या उपस्थितीत झाला.

यावेळी विविध अभ्यासक्रमांतील गुणवत्ता व प्रावीण्यप्राप्त विद्यार्थ्यांचा, तसेच विविध क्रीडा स्पर्धा व युवा महोत्सवातील कलरकोट प्राप्त विद्यार्थ्यांचा रोख पारितोषिक, सन्मानचिन्ह व प्रशस्ती प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

प्रास्ताविक आशाये समन्वयक डॉ. देशमुख यांनी केले. प्रमुख अतिथी आमदार चैनसुख संचेती यांनी विद्यार्थ्यांना कोणत्याही क्षेत्रात अग्रेसर राहण्यासाठी कठोर परिश्रम करण्याचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांनी सर्व सहभागी विद्यार्थ्यांना यश व परिश्रम यांची सांगड घालत भावी आयुष्य प्रगतिशील करण्याचे आवाहन केले.

संचालन देवश्री वऱ्हाडे, वैष्णवी इंगोले, समृद्धी माणेकर व निकीता तायडे यांनी केले. आभारप्रदर्शन विद्यार्थी परिषद सचिव आयुष गुप्ता यांनी केले. ◂*(तभा वृत्तसेवा)*



आमदार चैनसुख संचेती व डॉ. नितीन धांडे यांच्यासह मंचावर उपस्थित मान्यवर